# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** **विकास योजना नागपूर (सुधारित)**

**{नगर रचना विभाग}** नविन विधानभवनाचे विस्तारीकरणाचे बांधकाम – विधानभवन, नागपूरच्या लगत असलेली नागपूर महानगरपालिकेची त्रिकोणी आकाराची जागा व D.P. रस्त्यांची MRTP कायदा 1966 कलम-37 अंतर्गत प्रस्ताव मंजूर करण्याबाबत.

**संदर्भ:**- कार्यकारी अभियंता, म.रा.पा.सु.वि. महामंडळ मर्या., प्रादेशिक कार्यालय, नागपूर यांचे या कार्यालयास पत्र क्र. 1221, दि. 16.10.2025

नागपूर शहराच्या सुधारीत मंजुर विकास योजना मधील मौजा-सिताबर्डी, खसरा क्र. 283, नगर भुमापन क्र. 1855/1 मधील आरक्षण क्र. W-55 (पार्किंग) तथा लगतच्या रस्त्याची जागा फेरबदल करून नविन विधानभवनाचे विस्तारीकरणाचे बांधकामाकरीता उपलब्ध करून देण्याबाबत संदर्भिय पत्रान्वये प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झाले आहे.

नागपूर शहराची सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ (१) अन्वये शासन, अधिसूचना नगर विकास विभाग क्र. टिपीएस २४९६-२६४३ - प्र. क्र. ३०० (अ)-१७-नवि-९, दि. ०७ जानेवारी २००० अन्वये मंजुर झाली असून तो दि. ०१ मार्च २००० पासून अंमलात आलेली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२४००-१६२८-सी.आर.-२००-नवि-९, दि. १०.०९.२००१ अन्वये मंजुर झाली असून ती दि. २१.०९.२००१ पासून अमंलात आलेली आहे.

नागपूर शहराच्या मंजुर विकास योजना अहवालानूसार मौजा - सिताबर्डी, खसरा क्र. 283, नगर भुमापन क्र. 1855/1 पैकी 0.1296 हेक्टर जागा आरक्षण क्र. W-55 (पार्किंग) या आरक्षणाखाली राखीव असुन सदर जागा मोकळी आहे. सदर आरक्षण विकसीत करण्यासाठी समुचित प्राधिकरण तथा नियोजन प्राधिकरण नागपूर महानगरपालिका, नागपूर आहे.

उक्त जागेची व रस्त्याची मालकी नागपूर महानगरपालिकेच्या नावाने आखिव पत्रिकेनूसार दिसून येते. विकास योजना अहवालानूसार उक्त आरक्षण क्र. W-55 (पार्किंग) क्षेत्र 0.1296 हेक्टर (1296.00 चौ.मी.) व आरक्षणालगत 18.00 मी. रस्त्यामधील 85.00 मी. x 18.00 मी. = 1530.00 चौ.मी. जागा (अंदाजे) बाधीत होत आहे. (एकुण अंदाजे क्षेत्र 2826.00 चौ.मी.)

सध्यास्थितीत सदर जागेवर पार्किंगचे आरक्षण तथा रस्ता असल्याने उपरोक्त नमूद नविन विधानभवनाचे विस्तारीकरण शक्य नाही. वरील वस्तुस्थिती विचारात घेता मौजा - सिताबर्डी, खसरा क्र. 283, नगर भुमापन क्र. 1855/1 पैकी 0.1296 हेक्टर जागा आरक्षण क्र. W-55 (पार्किंग) तथा या आरक्षणालगत 18.00 मी. रूंदीचा अस्तित्वात असलेला रस्त्याचे वापर बदल करून लगतचे "सार्वजनिक / निर्मसार्वजनिक वापर (Public / Semipublic Zone)" चे वापर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये ठराव पारीत करून फेरबदलाची कार्यवाही करणे उचित राहील.

उक्त फेरबदल मंजूर विकास योजनेत प्रस्तावित करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 फेरबदल करणेस्तव महानगरपालिकेच्या ठराव घेणे

आवश्यक आहे. महानगरपालिकेचा ठरावास मंजूरी प्रदान केल्यानंतर त्यासंबंधिची सूचना शासन राजपत्र, दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करून त्यावरील आक्षेप / हरकतीवर योग्य निर्णय घेवून प्रस्ताव शासनास मंजूरीस्तव सादर करण्याकरीता मा. आयुक्त तथा प्रशासक, महानगरपालिका, नागपूर यांना अधिकार प्रदान करणे आवश्यक आहे.

याकरीता प्रशासकीय ठराव पारीत करून सदर फेरबदल प्रस्तावाबाबत संपुर्ण वैधानिक कार्यवाही केल्यांनतर सदर प्रस्ताव शासन मान्यतेकरीता सादर करणे आवश्यक आहे. याकरीता सदर फेरबदलाची सूचना शासन राजपत्रात, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे त्यावर प्राप्त आक्षेप/हरकतीवर सूनावणी देऊन व तद्नंतर उक्त प्रस्ताव शासनास मंजूरीस्तव सादर करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम - 37 अन्वये फेरबदल प्रस्ताव कार्यान्वित करणेकरीता प्रस्तावित आहे.

त्यानुषंगाने मौजा-सिताबर्डी, खसरा क्र. 283, नगर भुमापन क्र. 1855/1 मधील आरक्षण क्र. W-55 (पार्किंग) तथा लगतच्या रस्त्याची जागेचा फेरबदल प्रस्तावित करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. फेरबदलाचा सदर विषय विचारात घेणे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 81/मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 03/12/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपसंचालाक, नगर रचना विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार विकास योजना नागपूर (सुधारित) नविन विधानभवनाचे विस्तारीकरणाचे बांधकाम – विधानभवन, नागपूरच्या लगत असलेली नागपूर महानगरपालिकेची त्रिकोणी आकाराची जागा व D.P. रस्त्यांची MRTP कायदा 1966 कलम-37 अंतर्गत प्रस्ताव मंजूर करण्याबाबत.

**संदर्भ:-** कार्यकारी अभियंता, म.रा.पा.सु.वि. महामंडळ मर्या., प्रादेशिक कार्यालय, नागपूर यांचे या कार्यालयास पत्र क्र. 1221, दि. 16.10.2025

नागपूर शहराच्या सुधारीत मंजुर विकास योजना मधील मौजा-सिताबर्डी, खसरा क्र. 283, नगर भुमापन क्र. 1855/1 मधील आरक्षण क्र. W-55 (पार्किंग) तथा लगतच्या रस्त्याची जागा फेरबदल करून नविन विधानभवनाचे विस्तारीकरणाचे बांधकामाकरीता उपलब्ध करून देण्याबाबत संदर्भिय पत्रान्वये प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झाले आहे.

नागपूर शहराची सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ (१) अन्वये शासन, अधिसूचना नगर विकास विभाग क्र. टिपीएस २४९६-२६४३ - प्र. क्र. ३०० (अ)-१७-नवि-९, दि. ०७ जानेवारी २००० अन्वये मंजुर झाली असून तो दि. ०१ मार्च २००० पासून अंमलात आलेली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना, नगर

विकास विभाग क्र. टिपीएस-२४००-१६२८-सी.आर.-२००-नवि-९, दि. १०.०९.२००१ अन्वये मंजुर झाली असून ती दि. २१.०९.२००१ पासून अमंलात आलेली आहे.

नागपूर शहराच्या मंजुर विकास योजना अहवालानूसार मौजा - सिताबर्डी, खसरा क्र. 283, नगर भुमापन क्र. 1855/1 पैकी 0.1296 हेक्टर जागा आरक्षण क्र. W-55 (पार्किंग) या आरक्षणाखाली राखीव असुन सदर जागा मोकळी आहे. सदर आरक्षण विकसीत करण्यासाठी समुचित प्राधिकरण तथा नियोजन प्राधिकरण नागपूर महानगरपालिका, नागपूर आहे.

उक्त जागेची व रस्त्याची मालकी नागपूर महानगरपालिकेच्या नावाने आखिव पत्रिकेनूसार दिसून येते. विकास योजना अहवालानूसार उक्त आरक्षण क्र. W-55 (पार्किंग) क्षेत्र 0.1296 हेक्टर (1296.00 चौ.मी.) व आरक्षणालगत 18.00 मी. रस्त्यामधील 85.00 मी. x 18.00 मी. = 1530.00 चौ.मी. जागा (अंदाजे) बाधीत होत आहे. (एकुण अंदाजे क्षेत्र 2826.00 चौ.मी.)

सध्यास्थितीत सदर जागेवर पार्किंगचे आरक्षण तथा रस्ता असल्याने उपरोक्त नमूद नविन विधानभवनाचे विस्तारीकरण शक्य नाही. वरील वस्तुस्थिती विचारात घेता मौजा - सिताबर्डी, खसरा क्र. 283, नगर भुमापन क्र. 1855/1 पैकी 0.1296 हेक्टर जागा आरक्षण क्र. W-55 (पार्किंग) तथा या आरक्षणालगत 18.00 मी. रूंदीचा अस्तित्वात असलेला रस्त्याचे वापर बदल करून लगतचे "सार्वजनिक / निर्मसार्वजनिक वापर (Public / Semipublic Zone)" चे वापर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये ठराव पारीत करून फेरबदलाची कार्यवाही करणे उचित राहील.

उक्त फेरबदल मंजूर विकास योजनेत प्रस्तावित करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 फेरबदल करणेस्तव महानगरपालिकेच्या ठराव घेणे आवश्यक आहे. महानगरपालिकेचा ठरावास मंजूरी प्रदान केल्यानंतर त्यासंबंधिची सूचना शासन राजपत्र, दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करून त्यावरील आक्षेप / हरकतीवर योग्य निर्णय घेवून प्रस्ताव शासनास मंजूरीस्तव सादर करण्याकरीता मा. आयुक्त तथा प्रशासक, महानगरपालिका, नागपूर यांना अधिकार प्रदान करणे आवश्यक आहे.

याकरीता प्रशासकीय ठराव पारीत करून सदर फेरबदल प्रस्तावाबाबत संपुर्ण वैधानिक कार्यवाही केल्यांनतर सदर प्रस्ताव शासन मान्यतेकरीता सादर करणे आवश्यक आहे. याकरीता सदर फेरबदलाची सूचना शासन राजपत्रात, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे त्यावर प्राप्त आक्षेप/हरकतीवर सूनावणी देऊन व तद्नंतर उक्त प्रस्ताव शासनास मंजूरीस्तव सादर करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम - 37 अन्वये फेरबदल प्रस्ताव कार्यान्वित करणेकरीता प्रस्तावित आहे.

त्यानुषंगाने मौजा-सिताबर्डी, खसरा क्र. 283, नगर भुमापन क्र. 1855/1 मधील आरक्षण क्र. W-55 (पार्किंग) तथा लगतच्या रस्त्याची जागेचा फेरबदल प्रस्तावित करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.